सकाळ




रत्नागिरी : फिनोलेक्स, मुकुल माधव फाउंडेशनकडून भात बियाण्यांचे वाटप करताना रामबाबू संका. सोबत गिरीराज साळवी, सागर चिवटे, अर्चना साळवी आदी.

# फिनोलेक्स, मुकुल माधवकडून भात बियाण्यांचे वाटप

रत्नागिरी, ता. १४ : फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि मुकुल माधव फाउंडेशन यांच्या वतीने रत्नागिरी फणसोप-कसोप परिसरातील शेतकऱ्यांना भात बियाण्यांचे वाटप करण्यात आले. गेल्या १२ वर्षांपासून सुरू असलेल्या या उपक्रमामुळे परिसरातील शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध होत असून, यामुळे उत्पादन वाढण्यास मदत होत आहे. या उपक्रमांतर्गत कसोप, फणसोप, कुर्ली, वायंगणी आणि मागलाड या पाच गावांतील शेतकऱ्यांना भात बियाण्यांचे वितरण करण्यात आले.

फणसोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे अध्यक्ष आणि फणसोप ग्रामपंचायतीच्या सरपंच यांच्या विनंतीनुसार हा उपक्रम राबविण्यात आला. या बियाण्यांच्या मदतीने ५० एकरांहून अधिक क्षेत्र लागवडीखाली येणार असून, यंदाच्या हंगामात शेतकऱ्यांना चांगल्या उत्पादनाची अपेक्षा आहे. या कार्यक्रमाला पंचायत समिती सदस्या सौ. अर्चना साळवी, सोसायटीचे अध्यक्ष मनोज साळवी, राजेंद्र साळवी, समीर साळवी, तुषार साळवी, माजी सरपंच गिरिराज साळवी, फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे संचालक रामबाबू संका, व्यवस्थापक सागर चिवटे, वरिष्ठ अधिकारी आशिष आठवले आणि सीएसआर अधिकारी शामराव निंबाळकर उपस्थित होते. मुकुल माधव फाउंडेशनच्या संस्थापिका तथा फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या संचालिका रितू छाब्रिया यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील शेतकरी आणि गरजू कुटुंबांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत असल्याचे रामबाबू संका यांनी सांगितले.

### उत्पन्नात होतेय वाढ

दरवर्षी मिळणाऱ्या मोफत बियाण्यांमुळे चांगले उत्पादन मिळते. फणसोप सोसायटी आणि कंपनीच्या माध्यमातून बियाणे सहज उपलब्ध होत असल्याने शोधाशोध करण्याची गरज राहत नाही, असे शेतकरी मंजिरी पानगले यांनी सांगितले. तर मंगेश पावसकर यांनी या उपक्रमामुळे उत्पन्नात वाढ झाल्याचे नमूद केले.